जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे आदींनी अभिवादन केले.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची शिवाजी विद्यापीठात जयंती

कोल्हापूर, ता. ३० : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. चंदा सोनकर, डॉ. विजय सदामते, डॉ. मच्छिंद्र गोफणे, प्रकाश निकम, प्रकाश मुंज, हेमंत जाधव, आसावरी भालेराव, मयुरी दांडगे यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, सेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
पुण्यनगरी

# विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. चंदा सोनकर, डॉ. विजय सदामते, डॉ. मच्छिंद्र गोफणे, प्रकाश निकम, प्रकाश मंजू, हेमंत जाधव, आसावरी भालेराव, मयुरी दांडगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
पुढारी

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

कोल्हापूर : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. चंदा सोनकर, डॉ. विजय सदामते, डॉ. मच्छींद्र गोफणे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
तरूण भारत

## विद्यापीठात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती साजरी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
सकाळ

# नॅनोसायन्स अधिविभागात उद्यापासून 'ओपन डे'

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये 'ओपन डे'चा उपक्रम गुरुवारी (ता. २) आणि शुक्रवारी (ता. ३) आयोजित केला आहे.

या उपक्रमात गुरुवारी वैज्ञानिक पोस्टर कॉम्पिटिशन आणि शुक्रवारी वैज्ञानिक मॉडेल कॉम्पिटिशन असणार आहे. ही स्पर्धा दोन गटांत होणार असून, इयत्ता बारावी सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांचा एक गट व कोणत्याही विज्ञान विषयाच्या पदवी शाखेतील विद्यार्थ्यांचा दुसरा गट असणार आहे. या दोनही दिवशी विज्ञान-प्रदर्शनही सर्वांसाठी खुले असणार आहे. या स्पर्धांचे परीक्षक म्हणून भाभा अनुसंधान संशोधन केंद्र मुंबईतील शास्त्रज्ञ डॉ. नंदिता मयती, नीलोत्पल बरूआ उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती 'स्कूल ऑफ नॅनोसायन्स'चे संचालक प्रा. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024

# इंडो जर्मन टुल रूममध्ये दहा विद्यार्थ्यांची निवड

## विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागाचे यश

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील इंडो जर्मन टुल रूम या कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह झाला. यामध्ये ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नाने मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्राममधील दहा विद्यार्थ्यांची या कंपनीत नोकरीसाठी निवड झाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्राची पावसकर, ऋषिकेश पदमन, संदीप आंभोरे, संदीप बोलंगे, सुजित रणदिवे, मोहनीश लोहार, अजय गुजले, प्राची चव्हाण, निकिता दुधाळ, शुभम कारंडकर यांचा समावेश आहे. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर गणेश पाटील, सहायक प्राध्यापक सतीश काळे, सागर पोर्लेकर यांनी केले.



कोल्हापूर : कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये निवड झालेल्या शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांसह संचालक डॉ. एस. एन. सपली, डॉ. राजन पडवळ, डॉ. अजित कोळेकर, गणेश पाटील, सतीश काळे व सागर पोर्लेकर आदी.

आतापर्यंत मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रॅममधील विद्यार्थ्यांची अॅक्वा चिल सिस्टिम्स इंडिया, आयनॉक्स एअर प्रॉडक्ट्स, इलेक्ट्रॉनिका हाय टेक मशीन टुल्स, मेहता कॅड कॅम सिस्टीम्स, बीव्हीजी इंडिया, घाटगे पाटील इंडस्ट्रीज, पारिख मेटाकास्ट, व्हर्साटाइल आदी कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. या विद्यार्थ्यांना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली, मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रामचे समन्वयक डॉ. अभिजित कोळेकर, सेंट्रल प्लेसमेंट सेल ऑफिसर डॉ. राजन पडवळ यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
पुढारी

# विद्यापीठ प्रथम वर्ष अभ्यासक्रमाला मुदतवाढ

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

सन : २४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्नीत महाविद्यालयांमध्ये शिकवल्या जाणाऱ्या एम.एस्सी. व तत्सम अभ्यासक्रम तसेच विद्यापीठ अधिविभागांकडील अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्ष प्रवेशाला अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

एम.ए.एम.कॉम., एम.ए.(म्युझिक), ए. एम. ए. वूमेन्स स्टडीज, एलएल.एम., मास्टर ऑफ रूरल स्टडीज, एम.लिब. अँड इनफॉर्मेशन सायन्स, एम.एस्सी. (मॅथमॅथिक्स वुईथ कंम्प्युटर ॲप्लिकशन), एम.सी.ए. (संगणकशास्त्र), एम.बी.ए. (डिस्टन्स मोड), बीसीए, बी.ए. स्पोर्टस्, बी.ए. (फिल्म मेकिंग), बी.कॉम. (बँकिंग अँड फायनान्स), बी.एस्सी.-एम.एस्सी. नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी (एकात्मिक पाच वर्षे), बी.एस्सी.-एम.एस्सी. अर्थशास्त्र (एकात्मिक पाच वर्षे) या अभ्यासक्रमांच्या भाग १ प्रवेशाकरिता प्रवेश परीक्षेसाठी तसेच प्रवेश परीक्षेव्यतिरिक्त अभ्यासक्रमांसाठी दि. २५ मेअखेर मुदतवाढ देण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरळीतपणे सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येत असलेल्या उन्हाळी सत्रातील २२ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने पार पडल्या. या परीक्षांसाठी २ हजार १९६ विद्यार्थ्यांपैकी २९५ विद्यार्थी अनुपस्थित होते.



३० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. आजअखेर १९० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. या पथकांकडून कोल्हापूर -८, सातारा-१ अशी दोन जिल्ह्यांतून एकूण ९ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आलेली आहे.